बदलण्यास सुरवात झाल्या नंतर चार दिवसांनी फळे काढली जातात. पण निर्यात करण्यासाठी रंग बदलल्यानंतर एक दिवसात फळे काढली जातात.

### सेंद्रीय खते

सेंद्रीय खत ड्रॅगन फळ वनस्पती योग्य वाढ आणि विकास करणेसाठी फार महत्वाचे आहे. प्रत्येक झाडास सेंद्रीय खत १०-१५ कि.ग्रॅ. द्यावे आणि दर वर्षी २ कि.ग्रॅ. वाढवून २० किलो पर्यंत वाढवावे.

### रासायनीक खते

वनस्पतीचा योग्य वाढ आणि विकास होण्यासाठी, प्रत्येक चार महिन्यानंतर खाली नमूद केलेल्या खत मिश्रण प्रती वनस्पति द्यावे.

- यूरिया - ७० ग्रॅम.
- सुपन फॉस्फेट - ८० ग्रॅम.
- पोटॅश - ५० ग्रॅम.

अधिक उत्पन्न मिळविण्यासाठी नायट्रोजन ची कमी मात्रा आणि पोटॅशची जास्त मात्रा देणे महत्वाचे आहे. फुलांच्या काळात, फळ विकसित टप्प्यात तसेच फळे काढल्यानंतर (डिसेंबर) रोपाला खालील मिश्रण द्यावे.

- यूरिया - ५० ग्रॅम.
- सुपन फॉस्फेट - ६० ग्रॅम.
- पोटॅश - १०० ग्रॅम.

दरवर्षी २२५ ग्रॅम खताची मात्रा वाढवावी. एकूण १.५ किलो पर्यंत करावी.

### पाणी व्यवस्थापन

कोरड्या हंगामात सामान्य वाढ आणि जास्त उत्पन्न येण्यासाठी सिंचन आवश्यक आहे. तसेच कोरड्या झोन मध्ये सिंचन प्रणाली लागू करणे आवश्क आहे. यामध्ये ठिबक सिंचनाचा वापर केला जातो.

### उत्पादन

फळाचे सरासरी वजन सुमारे ३००-६०० ग्रॅम असते. सरासरी उत्पन्न ४-५ वर्षानंतर प्रति हेक्टरी १०-१२ टन मिळू शकते.

### अर्थशास्त्र

सुरवातीची गुंतवणुक रु. ६-७.५ लाख प्रती हेक्टर आहे. २-३ वर्षानंतर रु. ३-४ लाख प्रति हेक्टरी उत्पन्न मिळू शकते.


लागवड पद्धत


आवरण केलेले फळ


फुल


कच्चे फळ


फळे


कापलेले फळ

Technical folder no. : 6

संशोधन आणि संग्रहण

धनंजय नांगरे, योगेश्वर सिंग, पी. सुरेश कुमार, महेश कुमार, प्रवीण तावरे, एस. के. बल, जगदीश राणे व नरेंद्र प्रताप सिंग

**अधिक माहितीसाठी संपर्क**

निदेशक

भाकृअनुप-राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान

माळेगाव, बारामती 413 115, पुणे, महाराष्ट्र


02112-254057  02112-254056

www.niam.res.in

# ड्रॅगन फळ

## खडकाळ जमीन, कमी पाणी व कोरड्या हवामानासाठी संभावित पीक









भाकृअनुप ICAR

हर कदम, हर डगर किसानों का हमसफर
भारतीय कृषि अनुसंधान परिषद
Agrisearch with a human touch

राअस्ट्रैप्रसं NIASM

## भाकृअनुप राष्ट्रीय अजैविक स्ट्रैस प्रबंधन संस्थान

# ड्रॅगन फळ लागवड

## प्रस्तावना

ड्रॅगन फळ हे अनेक निवडुंग प्रजाती मधील महत्वाचे फळ आहे. याचे मुळ स्थान मेक्सिको आणि मध्य अमेरिका आहे. ही वनस्पती बारमाही आहे. तसेच व्यावसायिक दृष्ट्या व्हिएतनाम, थायलंड, मलेशिया, इस्त्राएल तसेच श्रीलंका येथे लागवड केली जाते. आता ड्रॅगन फळ श्रीलंकेमध्ये लोकप्रिय आहे. याची लागवड ओले झोन, मध्यम झोन तसेच कमी सिंचन सुविधा असलेल्या कोरड्या झोन मध्ये करता येते. यास पितया असेही संबोधले जाते.

## ड्रॅगन फळ प्रजातींचे तीन प्रकार

- लाल साल व पांढरा गर
- लाल साल व गुलाबी किंवा लाल गर
- पिवळी साल व पांढरा गर

| पोषण तत्त्वे प्रती ग्रॅम | फळ |
|---|---|
| पाणी | 82.5-83 ग्रॅम |
| प्रथिने | 0.159-0.229 ग्रॅम |
| चरबी | 0.21-0.61 ग्रॅम |
| फायबर | 0.7-0.9 ग्रॅम |
| कॅरोटीन | 0.005-0.012 ग्रॅम |
| कॅल्शियम | 6.3-8.8ग्रॅम |
| फॉस्फोरस | 30.2-36.1 ग्रॅम |
| लोह | 0.28-0.43 ग्रॅम |
| व्हिटॅमिन बी | 0.297-0.43 ग्रॅम |
| रायबोफ्लेविन | 0.043-0.044 ग्रॅम |

(संदर्भ : कृषि मंत्रालय, श्रीलंका)

## वापर

ड्रॅगन फळ हे शोभिवंत वनस्पती म्हणून ही महत्वाचे आहे. पिकलेली फळे थेट खाऊ शकतो. तसेच ती आईस्क्रीम, जेली, फळ रस तसेच वाईन साठी वापरली जाऊ शकतात. ड्रॅगन फळाच्या कळ्या करी तयार करण्यासाठी वापरू शकतात.

## ड्रॅगन फळाचे चांगल्या आरोग्यासाठी फायदे

- ड्रॅगन फळामध्ये कोलेस्ट्रॉलचे प्रमाण कमी आहे.
- ड्रॅगन फळ खाल्याने पाचन शक्ती वाढते.
- ड्रॅगन फळामध्ये व्हिटॅमिन सी सोबत इतर पोषक तत्त्वांचा भरपूर साठा आहे.
- ड्रॅगन फळामध्ये प्रतिरोधक शक्ती आहे जे कर्करोग व इतर अनिष्ट आरोग्य प्रतिबंध करण्यासाठी उपयुक्त आहे. तसेच त्यामध्ये मधुमेह, उच्च कोलेस्ट्रॉल तसेच रक्तदाब नियंत्रित करण्याची क्षमता आहे.
- ड्रॅगन फळा मध्ये मोनो अनसॅच्युरेटेड फॅटस् मुख्यत: आहेत.

## हवामान

ड्रॅगन फळ खराब खडकाळ जमिनीमध्ये येऊ शकते आणि तापमान मध्ये चढ उतार असले तरी त्यावर प्रभाव पडत नाही. उष्णदेशीय हवामानामध्ये ड्रॅगन फळ लागवड चांगली होते. त्यासाठी इष्टतम तपमान २०°-३०°C व सुमारे ५०० ते १५०० मिमी वार्षिक पाऊस आवश्यक आहे. पर्यायी कोरड्या आणि ओल्या हवामान स्थितीत चांगला सूर्यप्रकाश आवश्यक आहे. पण तो दीर्घ कालावधीसाठी अनुकूल नाही. त्यावेळी सावली करणे महत्वाचे आहे.

## माती आणि पाणी

चांगला निचरा असणारी जमीन ड्रॅगन फळ लागवडीसाठी महत्वाची आहे. १०-३०% वालुकामय जमीन बरोबर सेंद्रीय पदार्थ, वनस्पतीच्या चांगल्या वाढीसाठी आवश्यक आहे. वालुकामय जमीन ड्रॅगन फळ लागवडीसाठी योग्य आहे.

**लागवड साहित्य** : १. कटींग / कलमे  २. रोपे

## लागवड साठी कटिंग वापरण्याची पद्धत

वनस्पतीपासून निवडलेले कटिंग तयार करा. १५-२० सें.मी. चे कटिंग लागवडीसाठी वापरले जातात. नंतर हे कटिंग प्लॅस्टिक पिशवी मध्ये लावली जातात. त्यासाठी आवश्यक लागवड मिश्रण आहे.

कोरडे शेण : १ भाग  शीर्ष माती : १ भाग

वाळू : २ भाग

मुळे तयार होण्यासाठी पिशव्या शेड मध्ये ठेवा. रुजलेली कटिंगची फील्ड मध्ये लागवड करा.

## लागवड पद्धत

लागवडीचे अंतर ३×३ मीटर आहे.

खड्डा ६०×६०×६० सें.मी. करावा. हे खड्डे सिंगल सुपर फॉस्फेट १०० ग्रॅम आणि माती कुजलेले शेण किंवा कंपोस्ट करून भरावेत. निचरा सुधारण्यासाठी लहान विटांचे तुकडे आणि वाळू खड्ड्याच्या तळाशी टाकावी.

## वनस्पती ट्रेनिंग

ड्रॅगन फळाची योग्य वाढ होण्यासाठी व आधारासाठी लाकडी किंवा सीमेंट खांब वापरले जाऊ शकतात. अपरिपक्व खोडांना सरळ वाढण्यासाठी खांबा बरोबर बांधणे आवश्यक आहे. त्यानंतर खोडावर मुळे विकसित होऊन ती खांबा बरोबर चिकटून राहतील. बाजूकडी स्टेम्स मर्यादित करून आवश्यक २-३ मुख्य स्टेम्स वाढवावेत. बाजूकडील शुट्स/स्टेम्स वेळोवेळी काढले जावेत. समतोल झुडूप राखण्यासाठी गोल लोखंडी/सिमेंट/लागडी फ्रेम सर्वात वरती लावणे आवश्यक आहे. त्यावरती फांद्यांची वाढ केली जाते.

## रोग

विशेषत: ड्रॅगन फळावर कीटक आणि रोग यांचा प्रभाव कमी आहे. पण काही देशांमध्ये बुरशीजन्य रोगाची नोंद करण्यात आली आहे.

## फुलोरा व फलधारणा

ड्रॅगन फळ फूल रात्री उमलते. त्याचा रंग पांढरा असतो. त्यांचा सुवासिक वासाने कीटक आकर्षण करण्यास मदत करते. फुले येण्यास मे/जून या कालावधीत आरंभ होतो. फुलाच्या सौंदर्यामुळे यास चंद्र कमळ किंवा रात्र फुलाची राणी म्हणतात.

फुलोऱ्या नंतर फळे ३०-३५ दिवसात परिपक्व होतात. कालावधी जुलै पासून नोव्हेंबर पर्यंत सुरु राहतो. या काळात पाच ते सहा वेळा तोडणी केली जाऊ शकते. अपरिपक्व अवस्थेत बाह्य आवरण गडत हिरव्या रंगाचे असते. ते परिपक्व झाल्यानंतर लाल रंगाचे होईल. रंग